## उल्लेखनीय कार्य

नाट्यपरिषदेच्या वेबसाईटचे काम पूर्ण झाले असून www.natyaparishad.org या संकेतस्थळावर ती आपण पाहू शकता. भारतात जिथे नाट्यविषयक चळवळ आहे तिथे ती अधिक जोमाने सुरू व्हावी, त्याला चालना मिळावी, यासाठी तिथे नाट्य परिषदेच्या शाखा सुरू करण्याबाबतही प्रयत्न सुरू आहेत. नाट्यपरिषदेच्या नांदेड-दक्षिण, नागपूर महानगर, अंबाजोगाई, सोलापूर महानगर, महाबळेश्वर, ऐरोली, लातूर महानगर, इचलकरंजी, मुक्ताईनगर येथे नवीन शाखा सुरू करण्यात आल्या आहेत.

## यशवंत नाट्यमंदिर

आपल्या यशवंत नाट्य मंदिरात एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ पर्यंत एकुण ६८० कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी नाटके, मराठी कार्यक्रम, इतर भाषिक कार्यक्रम, शुटींग, सभा इत्यादींचा समावेश आहे. या कार्यक्रमांच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिद्ध व्यक्तींनी नाट्यगृहास भेट दिली. नाट्य संकुलाच्या नूतनीकरणासाठी पंच्याहत्तर लाखाचा मंजूर निधी मिळण्यासाठी संकुलाच्या नूतनीकरणाच्या खर्चाचा संपूर्ण तपशील पाठविण्यात आला आहे. तो लवकरच प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.

## ९६ वे नाट्य संमेलन २०१६, ठाणे

९६ व्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने रंगभूमीच्या अभिवृद्धिसाठी नाट्यलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेतील **प्रथम क्रमांक रू. २१,०००/-, द्वितीय क्रमांक रू. ११,०००/-, तृतीय क्रमांक रू. ७,०००/- व विशेष पुरस्कार** म्हणून **रू. ३,०००/-** आणि उत्तेजनार्थ पुरस्कार रू. १,०००/- अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे **'९६ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन' ठाणे शाखेच्या विद्यमाने 'ठाणे'** येथे दि. १९ फेब्रुवारी ते दि. २१ फेब्रुवारी २०१६ या काळात ज्येष्ठ नाटककार श्री. गंगाराम गवाणकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या सोहळ्यात विविध करमणूकीचे कार्यक्रम सादर करण्यात आले. या सोहळ्याचा **उद्घाटन समारंभ शुक्रवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०१६ रोजी सायं. ७.०० वाजता हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नाट्य नगरी, नटवर्य मामा पेंडसे रंगमंच (दादोजी कोंडदेव क्रिडांगण) ठाणे येथे आणि समारोप सोहळा रविवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१६ रोजी सायं. ५.०० वा.** संपन्न झाला.

९६ व्या नाट्यसंमेलनाप्रित्यर्थ ठाणे येथे दिनांक १२ फेब्रुवारी २०१६ ते १८ फेब्रुवारी २०१६ पर्यंत स्थानिक लोकांसाठी विविध नाटके व कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात संगीत कटयार काळजात घुसली (नाटक), तेजोमय रूक्मिणी हा संगीत स्वयंवर या नाटकाच्या शताब्दीनिमित्त विशेष कार्यक्रम,शेवग्याच्या शेंगा (नाटक), सप्तसूर झंकारीत बोले (संगीतमय कार्यक्रम), सोबतीने चालताना (नाटक) सन्यस्त ज्वालामुखी (नाटक), तिन्ही सांज (नाटक), मंगळावर स्वारी (बालनाट्य), बॅन्क ऑफ बालपण (बालनाट्य), बायांनो नवरे सांभाळा (नाटक), गाढवाचं लग्न (वगनाट्य), विक्रम मोहिनी राजवाडे (नाटक), ठाणे तिथे काय उणे (सांस्कृतिक कार्यक्रम) यांचा समावेश होता. तलावपाळी येथे पहाटे ६.०० वाजता श्री. राहुल देशपांडे व श्री. आनंद भाटे यांनी सादर केलेले नाट्यसंगीत व ९.०० वाजता तीन बालनाट्ये सादर करण्यात आली.